# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक :
(०२०) २५६२ ११९०
२५६२ ११९१
२५६२ ११९२
२५६२ ११९३

शैक्षणिक विभाग (संलग्नता कक्ष)
गणेशखिंड, पुणे — ४११ ००७
टेलिग्राफ : 'युनिपुणे'
संकेतस्थळ : www.unipune.ac.in
ई—मेल:affiliation@pun.unipune.ac.in


संदर्भ क्र.: सीए/२४२२ दिनांक : २८ सप्टेंबर, २०२३

## महत्वाची सुचना

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था,
पुणे, अहमदनगर व नाशिक
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

विषय :— बृहत आराखडयाच्या अनुषंगाने नवीन स्थळबिंदू/अभ्यासक्रम इत्यादींचे प्रस्ताव स्विकारणेबाबत.

संदर्भ :— १. मा.उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार, मुंबई —४०००३२ यांचे जा.क्र. बृहत २०२३/प्र.क्र.०५/विशि—५, दि. २७/०९/२०२३.
२. मा.कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांचे परिपत्रक क्र.२२०/२०२३.

महोदय/महोदया,

संदर्भ .क्र.२ मध्ये नमूद केलेल्या परिपत्रक क्र.२२०/२०२३ नुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठास अनुक्रमे गुरूवार दिनांक २८/०९/२०२३ व शुक्रवार दिनांक २९/०९/२०२३ रोजी सुट्टी जाहीर करण्यात आलेली असल्याने विद्यापीठ कार्यालय बंद राहील, असे कळविण्यात आलेले आहे.

संदर्भ क्र.१ नुसार मा. मा.उपसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार, मुंबई —४०००३२ यांनी सर्व मा.कुलगुरू/मा.कुलसचिव, अकृषी विद्यापीठे यांना अग्रेषित केलेल्या पत्रामध्ये **नवीन स्थळबिंदू/अभ्यासक्रम इत्यादींचे प्रस्ताव स्विकारण्याची अंतिम मुदत दि. ३० सप्टेंबर, २०२३ अशी असल्याने दि. २८, २९ व ३० सप्टेंबर, २०२३ रोजी सदर प्रस्ताव स्विकारण्याची विद्यापीठांमध्ये व्यवस्था करण्यात यावी, असे कळविलेले आहे.**

उपरोक्त संदर्भ क्र.१ नुसार तसेच प्राप्त आदेशानुसार, **नवीन स्थळबिंदू/अभ्यासक्रम इत्यादींचे प्रस्ताव स्विकारण्याकामी दि. २८, २९ व ३० सप्टेंबर, २०२३ रोजी** शैक्षणिक विभाग (संलग्नता कक्ष) कार्यालयीन **वेळेप्रमाणे सुरू ठेवण्यात येत आहे, याची सर्व संबंधितांनी कृपया नोंद घ्यावी.**

**कळावे,**

28/9/2023

(स.द.डावखर)
उपकुलसचिव
शैक्षणिक विभाग (संलग्नता कक्ष)

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग मंत्रालय विस्तार, कक्ष क्रमांक - ४२०,
चौथा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२.
दूरध्वनी क्र - ०२२-२२७९३१७१ Email ID : vishi5.hted-mh@mah.gov.in

क्र. बृहत २०२३/ प्र.क्र.०५/ विशि-५ दिनांक : २७.०९.२०२३

प्रति,

सर्व कुलगुरु / कुलसचिव,
अकृषी विद्यापीठे

विषय : बृहत आराखडयाच्या अनुषंगाने नवीन स्थळबिंदु अभ्यासक्रम इत्यादीचे प्रस्ताव स्विकारणेबाबत.

महोदय/ महोदया,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने, मुंबई विभागामध्ये शासनाने अनंत चतुर्दशीची सार्वजनिक सुट्टी जाहिर केली आहे. तसेच दि.२९ सप्टेंबर, २०२३ रोजी शासनाने ईद निमित्त सार्वजनिक सुट्टी जाहिर केली आहे. तथापि, नवीन स्थळबिंदु अभ्यासक्रम इत्यादी चे प्रस्ताव स्विकारण्याची अंतिम मुदत दि. ३० सप्टेंबर, २०२३ अशी असल्याने दि.२८, २९ व ३० रोजी नवीन स्थळबिंदु तसेच अभ्यासक्रमांचे प्रस्ताव स्विकारण्याची विद्यापीठांमध्ये व्यवस्था करण्यात यावी.

आपला,

(अजित बाविस्कर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

ANaik - पत्र टिप्पणी